www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ शिंदेंकडे मुख्यमंत्रीपद असले तरी भाजप ठरला ठाण्यात मोठा भाऊ

पान ३ वर....



■ माथेरान मध्ये गटारावरील अतिक्रमणामुळे...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार,२५ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा भाजपचाच..?

### नव्या सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना असणार संधी

● मुंबई, यश सावंत :



विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. या निवडणुकीत महायुतीने थेट २३० चा आकडा गाठला. या निकालानंतर आता महायुतीच्या सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. यामुळे महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी वाढल्या आहेत. सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी देखील आमदारांची रेलचेल वाढली आहे.

विधानसभा निवडणुकीत यश मिळाल्यानंतर महायुतीकडून सत्तास्थापनेचा दावा केला जाणार आहे. त्यामुळे महायुतीने बैठकांचा सपाटा लावला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्रिपदाचा पॅटर्न कायम राहणार आहे. महायुती सरकारच्या तिन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांकडे ही प्रमुख पद कायम राहणार आहे. भाजप महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा भाजपचाच असणार आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी कांग्रेस यांना सत्तेत योग्य सन्मान दिला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

तसेच या नव्या सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. मागच्या मंत्रिमंडळातील अनेक चेहऱ्यांना वगळण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवसेनेतील माजी मंत्र्यांपैकी काही मंत्र्यांचा पत्ता कट होणार आहे. त्याचबरोबर वादग्रस्त मंत्र्यांना डच्चू देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शिंदेंच्या आमरांनी शिंदेच मुख्यमंत्री व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तर सर्वाधिक आमदार निवडून आल्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री व्हावा अशी भाजपच्या आमदारांची अपेक्षा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री कोण होणार याचीच जोरदार चर्चा सुरू झाली आहे.



## राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष, समाजवादी शब्द प्रकरणीच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय आदेश सुनावणार

● दिल्ली, प्रगती शर्मा :

१९७६ च्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता'सारखे शब्द समाविष्ट करण्यात आले आहेत. आणीबाणीच्या काळात संसदेने जे काही केले ते निरर्थक ठरविण्यासंदर्भात काही सांगता येत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान नोंदविले.

पान २ वर

## निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी राजभवनात जाऊन राज्यपालांची घेतली भेट

### राज्यातील राजकीय हालचालींना वेग

● मुंबई, विशाल कारंडे :




महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे निकाल शनिवारी लागले. दुसरीकडे राज्याच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी पूर्ण होणार आहे. आता येणाऱ्या दोन दिवसांत सरकार स्थापन झाले नाही तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू शकते. राज्यातील निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आहे. यामुळे महायुतीला दोन दिवसांत सरकार स्थापन करणे शक्य आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाचे अधिकारी राजभवनात दाखल झाले. त्यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना राज्य विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना दिली. त्यामुळे आता राज्यपाल बहुमत असलेल्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी निमंत्रण देऊ शकणार आहे. भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची मुंबईतील राजभवनावर जाऊन भेट घेतली. त्यांनी राज्यपालांना राज्य विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना आणि निवडून आलेल्या सदस्यांची यादी तसेच राजपत्राची प्रत सादर केली.

पान २ वर

## डोंबिवलीत भाजपाचा गड राखण्यात रविंद्र चव्हाण यशस्वी

● ठाणे, प्रथमेश चव्हाण :



कळता क्षणी कुणाच्याही सुख-दुःखाला धाऊन जाणारा सर्वसामान्यांचा मित्र अशी ओळख असलेल्या, तसेच वक्तृत्व, कर्तुत्व आणि नेतृत्व अशा तिन्ही गुणांची परिपक्वता असलेल्या रविंद्र चव्हाण यांनी सुशिक्षितांच्या सांस्कृतिक डोंबिवलीवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. गेल्या १५ वर्षांपासून डोंबिवली शहरावर आपली हुकूमत कायम ठेवणाऱ्या रविंद्र चव्हाण यांनी यावेळीहा चौथ्यांदा ७६ हजार ८९६ मताधिक्य मिळवून भाजपाचे निर्विवाद वर्चस्व कायम ठेवले आहे.

विशेष म्हणजे शक्तिशाली नेता म्हणून डोंबिवली विधानसभेचा उमेदवार, भाजपाचा स्टार प्रचारक आणि स्वत:च्या डोंबिवली मतदार संघाव्यतिरिक्त पालघर जिल्ह्यासह कोकणात महायुतीन दिलेल्या उमेदवारांच्या प्रचाराची जबाबदारी रविंद्र चव्हाण यांच्यावर सोपविण्यात आली होती. मंत्री पदावर असताना गेल्या पंधरा वर्षांतील विकासकामांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या स्वपक्षासह संघ परिवारातील काही मंडळींनी चव्हाण यांच्या विरोधात, तर काहींनी उघडपणे काम केल्याच्या तक्रारी होत्या. मात्र पक्षीय मतभेद विसरून याच चव्हाण यांनी शिवसेनेतील काही दिग्गज नगरसेवकांसह पश्चिम डोंबिवलीतील काही नगरसेवकांना विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला होता. यातील काहींनी निवडणुकीच्या तोंडावर चव्हाण यांना शब्द देऊन नंतर दीपेश म्हात्रे यांच्यासाठी काम सुरू केल्याच्या चर्चा सुरू होत्या. पश्चिम डोंबिवलीतील आगरी समाजाचे नगरसेवक आणि समाज दिपेश म्हात्रे यांना साथ देत असल्याचे वातावरण निर्माण करण्यात आले होते. एकीकडे मुलासाठी वडील पुंडलिक म्हात्रे यांच्यासह सर्व कुटुंबीय, नातेवाईक आणि आगरी समाजातील आप्तेष्ट दिपेश यांच्यासाठी प्रचार करत होते.

पान २ वर

## कल्याण ग्रामीण मतदारसंघात आमदार बदलायची परंपरा कायम; पुन्हा नवीन आमदार !

● डोंबिवली, आकाश कांबळे :



कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी कधीही एकाच आमदाराला निवडून दिलेलं नाही, ना एकच आमदार कायम ठेवण्याची परंपरा जतन केलेली आहे. त्यामुळे यावेळीही कल्याण ग्रामीणच्या मतदारांनी कल्याण ग्रामीणमध्ये नवख्या असलेल्या शिवसेना डोंबिवली शहर प्रमुख राजेश मोरे यांना आपलेसे करून स्पर्धक उमेदवारांपेक्षा अधिकचे मताधिक्य मिळून देत जिंकून आणले. राजेश मोरे यांनी मनसे उमेदवार राजू पाटील आणि ठाकरे गटाचे उमेदवार सुभाष भोईर यांचा पराभव केला. दरम्यान, भोईर आणि पाटील यांनी आपल्या मतदारसंघांमध्ये मतदारांची जी बेगमी केली होती ती फोडण्यात खासदार शिंदे यांना यश आले.

शिवसेनेचे राजेश मोरे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासादार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे खास समर्थक असल्याने शिंदे पिता-पुत्रांनी त्यांना चांगलेच पाठबळ दिल्याची चर्चा होती. तसेच शिंदे यांनी आपली पुर्ण ताकत लावत राजेश मोरे यांना निवडून आणले. याउलट मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची बदलत्या भूमिकेमुळे आणि महायुतीची तडजोड न केल्यामुळे राजू पाटील यांचा पराभव झाला अशी चर्चा रंगू लागली आहे.

कोणत्याही परिस्थितीत आमदार पाटील यांना या भागाचे पुन्हा नेतृत्व संधी मिळू नये. याच इर्षेतून खासदार शिंदे यांनी मोरे यांना मैदानात उतरवले आणि राजकीय नजरेत नसलेले, मतदारांच्या मनात नसलेले राजेश मोरे अचानक कल्याण ग्रामीणमध्ये मताधिक्य मिळून स्थानिक दोन्ही भूमिपुत्र उमेदवारांना शह देऊन पुढे गेले.

पान २ वर

## बारामतीचा दादा 'अजितदादा'! विधानसभेला शरद पवारांचं आवाहन जनतेन नाकारलं

● पुणे, अभिजित येरल्लू :




महाराष्ट्रच्या विधानसभेच्या निकालाने अजित पवारांच्या राष्ट्रवादीने काका शरद पवारांना धोबीपछाड दिलाय. राज्यातील ३८ जागांवर दोन्ही राष्ट्रवादी आमने-सामने आले होते. यामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीने जोरदार मुसंडी मारली. तर जनतेने खरी राष्ट्रवादी कोणती? याचं उत्तर दिल्याची प्रतिक्रीया अजित पवारांच्या राष्ट्रवादीने दिलीय. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने मुसंडी मारलेली. एवढंच नाही तर अजित पवारांचं होम पिच असलेल्या बारामतीतून सुप्रिया सुळेंना तब्बल ४८ हजार मतांची आघाडी मिळाली होती. त्यातच शरद पवारांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारांच्या मतदारसंघात जाऊन गद्दारांना पाडण्याचं आवाहन केलं होतं.

शरद पवारांनी अजित पवारांच्या पक्षाच्या उमेदवारांच्या मतदारसंघात जाऊन गद्दारांन पाडा, असं आवाहन केलं होतं. लोकसभेतील पराभवातून अजित पवारांच्या राष्ट्रवादीने धडा घेत नव्या योजना आखल्या. त्यातच लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना साद घातली. त्याचाच अजितदादांच्या पक्षाला मोठा फायदा झाला. आता मिळवलेलं यश कायम ठेऊन अजित पवार कशी वाटचाल करणार? याकडे लक्ष लागलं आहे

## "आता बॅगेतून चार कोट आणले आहेत", मंत्रिपदाबाबत भरत गोगावलेंचं विधान

● रायगड, विशाल पाटील :



महाड विधानसभा मतदारसंघातून भरत गोगावले १ लाख १७ हजार ४४२ मतांनी विजयी झाले. तर, त्यांच्याविरोधात असलेल्या शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या स्नेहल जगताप २६ हजार मतांनी पराभूत झाल्या. शिवसेनेत फूट पडल्यापासून भरत गोगावलेंनी शिवसेनेची सातत्याने बाजू सांभाळली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सतत उभे राहिले. त्यामुळे आपल्याला नक्कीच मंत्रिपद मिळेल अशी आशा त्यांनी कायम ठेवली. तसंच, मंत्रिपदासाठी कोट शिवून घेतला असल्याचंही वक्तव्य त्यांनी मागच्या वेळी केलं होतं. त्यामुळे यंदा तरी त्यांच्या गळयात मंत्रिपदाची माळ पडणार का असा प्रश्न उपस्थित होतोय.

मंत्रिपदाच्या प्रश्नावर भरत गोगावले म्हणाले, मी २६ हजारांनी मी निवडून आलो आहे. टीका टिप्पणी करणाऱ्यांनीही आम्हाला मते दिलीत. फुल्ल स्वींगमध्ये आम्ही आहोत. तिन्ही पक्षाचे चांगले आमदार निवडून आले आहेत. काळजी करण्याचं कारण नाही. टीका टिप्पणी करणाऱ्यांची तोंडं बंद केली आहेत. मी मंत्रीपदाबद्दल या अगोदर बोललो नव्हतो. आता आमचा नंबर असावा असं मला वाटतं." आताही मंत्रिपदाच्या शपथविधीसाठी कोट शिवून ठेवलाय का असा प्रश्न त्यांना विचारला असता ते म्हणाले, "आताही बॅगेत कोट आणले आहेत. चार कोट आणले आहेत. हवंतर तुम्हाला दाखवतो. काळजी करण्याचं कारण नाही.

## विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शरद पवारांनी केला सातारा दौरा



● सातारा, सचिन कदम :

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा पराभवाला सामोरे जावं लागलं आहे. महाविकास आघाडीच्या मोठ्या पराभवानंतर शरद पवार यांनी रविवारी साताऱ्यात पहिली प्रतिक्रिया दिली. महायुतीच्या खोट्या प्रचाराचा फटका बसल्याची प्रतिक्रिया शरद पवार यांनी सांगितलं.

शरद पवार यांनी रविवारी सातारा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान, शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालावर पत्रकार परिषदेत भाष्य केलं. विधानसभा निवडणुकीच्या निकालावर शरद पवार म्हणाले, ' हा लोकांनी निर्णय दिला आहे. आमची अपेक्षा होती तसा निकाल लागला नाही. पण शेवटी लोकांनी दिलेला निर्णय दिला आहे. असा अनुभव आम्हाला कधी आला नाही. मात्र आता याचा अभ्यास करावा लागणार आहे. या निकालानंतर आम्ही त्याची कारणमिमांसा करू. त्यानंतर पुन्हा नव्याने कामाला सुरुवात करू. मी निवृत्त व्हावं की नाही, हे मी आणि माझे सहकारी ठरवतील. दुसऱ्यांनी कशाला सांगायला पाहिजे. लाडकी बहीण योजनेवर भाष्य करताना शरद पवार म्हणाले, 'लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून काही रक्कम महिलांना दिली. आम्ही सत्तेत नसलो तर हे पैसे बंद होतील असा प्रचार करण्यात आला. त्यामुळे कदाचित महिलांनी मत महायुतीला दिलं असेल.

पान २ वर

# राजेश मोरे यांच्या विजयात कुणाल पाटील फाऊंडेशनची निर्णायक भूमिका



**कल्याण (आकाश कांबळे)** : कल्याण ग्रामीण मतदारसंघात मनसेचे एकमेव आमदार राजू पाटील निवडणुकीच्या रिंगणात असल्याने कल्याण ग्रामीण मतदारसंघावर सर्व राज्याचे लक्ष लागले होते. मात्र यावेळी राजू पाटील यांना शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेश मोरे यांनी धक्का देत विजय मिळवला. तब्बल ६६ हजाराहून जास्त मताधिक्क्याने राजेश मोरे हे निवडून आले आहेत. दरम्यान, त्यांच्या या विजयामध्ये कुणाल पाटील फाऊंडेशनची देखील निर्णायक भूमिका आहे. कुणाल पाटील फाऊंडेशनने दिलेल्या पाठिंब्यामुळे राजेश मोरे यांचा विजय सुकर झाला. कुणाल पाटील फाऊंडेशनच्या शोभा पाटील यांनी उमेदवार राजेश मोरे यांच्या विजयासाठी ग्रामीण भागात प्रचार फेरी काढली. तसेच महिला वर्गासह नागरीकांच्या बैठका घेतल्या. विशेषतः आडीवली ढोकळी, दावडी, गोळवली, पिसवली, भाल यासह इतर भागातील नागरीकांशी त्यांनी स्वतः संवाद साधला. महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी नागरीकांना त्यांनी आवाहन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात सुरू केलेल्या विकासकामांचा धडाका आणि कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी कल्याण लोकसभा मतदार संघात केलेल्या विकास कामांना प्रभावित होऊन कुणाल पाटील फाऊंडेशनने लोकसभा निवडणूकीतही महायुतीला पाठिंबा दिला होता. खासदार शिंदे यांच्या बाजूने नागरीकांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. लोकसभा निवडणूकीच्या पाठोपाठ कल्या लोकसभा मतदार संघाप्रमाणेच कल्याण ग्रामीण मत संघात महायुतीचा आमदार असल्यास विकास कामांमध्ये सुसंगती राहून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल.

# ठाणे जिल्ह्यात २५ नोव्हेंबर पासून पशुगणनेस प्रारंभ

**ठाणे (राकेश गायकवाड)** - पशुगणनेला दि. २५ नोव्हेंबरपासून ठाणे जिल्ह्यात प्रारंभ होणार आहे. दि. २८ फेब्रवारी पर्यंत ही मोहीम चालणार आहे. तीन हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची नियुक्ती केली आहे. पशुगणनेमुळे पशुसंवर्धन विभागाला योजनांची अंमलबजावणी करणे, निधीची उपलब्धता करणे सोयीचे ठरणार आहे. पशुसंवर्धन विभागाकडुन दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच हो मोहीम राबवली जाते. मागील पशुगणना २०१९ मध्ये झाली होती. वास्तविक २०१७ मध्ये पशुगणना होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्यासाठी दोन वर्षाचा विलंब झाला होता. यंदाची पशुगणना २५ नोव्हेंबरपासून सुरु केली जाणार आहे. त्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून तयारी केली जात आहे.पशुगणनेसाठी प्रगणकांची नेमणुक केली आहे. त्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे. पशुधन पर्यवेक्षक पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांची या कामासाठी नियुक्ती केली आहे. या मेहीमेत गायवर्ग, म्हैसवर्ग, शेळी- मेंढी, अश्व, वराह यांची गणना केली जाणार आहे. पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते, शिवाय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे. त्यानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो.

# शिंदेंकडे मुख्यमंत्रिपद असले तरी भाजप ठरला ठाण्यात मोठा भाऊ, एका जागेचा झाला लाभ

**ठाणे (सुचित शिंदे)** : लोकसभा निवडणुकीत भिवंडीची जागा गमावल्यामुळे ठाणे जिल्ह्यात राजकीय संकटात सापडलेल्या भाजपने विधानसभेच्या नऊ जागा जिंकून ठाणे जिल्ह्यात शंभर टक्के यश प्राप्त करीत मोठा भाऊ होण्याचा मान मिळवला. मागील वेळी मीरा-भाईंदरमध्ये नरेंद्र मेहता यांचा पराभव झाल्याने गमावलेली जागा यावेळी भाजपने जिंकून १८ पैकी नऊ जागा मिळवल्या. मागील वेळी जिंकलेल्या आठ जागा राखण्यात या पक्षाला यश प्राप्त झाले.



ठाणे जिल्ह्यातील एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद असले तरी जिल्ह्यात मोठा भाऊ भाजप हाच आहे. भविष्यातील महापालिकांमधील शिंदेसेनेच्या राजकारणाकरिता भाजपचा वाढता प्रभाव ही धोक्याची घंटा आहे.

मागील निवडणुकीत मीरा-भाईंदर मतदारसंघात भाजपने मेहता यांना उमेदवारी दिली होती. मात्र भाजपच्याच गीता जैन यांनी अपक्ष अर्ज दाखल करून मेहता यांचा पराभव केला. जैन या भाजपच्या सहयोगी सदस्य झाल्या होत्या. यावेळी जैन यांना उमेदवारी नाकारून मेहता यांनाच भाजपने तिकीट दिले. मेहता यांनी जैन यांचा पराभव केला. याच अतिरिक्त जागेचा भाजपला जिल्ह्यात लाभ झाला.

## कल्याण पूर्वेत शिंदेसेनेवर मात

कल्याण पूर्वेतील भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांचा शिंदेसेनेचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यासोबत एका जमिनीवरून संघर्ष सुरू होता. त्यातून गणपत गायकवाड यांनी उल्हासनगर पोलिस ठाण्यात महेश यांच्यावर गोळीबार केल्याने महायुतीमधील दोन्ही पक्षात वितुष्ट आले होते. गणपत गायकवाड तुरुंगात असल्याने भाजपने त्यांच्या पत्नी सुलभा यांना उमेदवारी दिली. कल्याण पूर्वेत सुलभा यांचा सामना महेश गायकवाड यांच्याशीच झाला. अखेर सुलभा विजयी झाल्या. महेश हे दुसऱ्या स्थानावर राहिले तर उद्धवसेनेचे धनंजय बोडारे तिसऱ्या स्थानावर फेकले गेले.

# मी गेल्या निवडणुकीत..', विधानसभेच्या निकालानंतर प्रताप सरनाईकांनी करुन दिली आठवण

**ठाणे (भावना जैन)** : राज्यात पुन्हा एका महायुतीचं सरकार स्थापन होणार आहे. आता खातेवाटपाकडे सर्वांचं लक्ष असून नेतेही जाहीरपणे आपल्या इच्छा व्यक्त करु लागले आहेत. प्रताप सरनाईक यांनी यंदा आपल्याला मंत्रीपद मिळेल अशी इच्छा व्यक्त केली आहे. विधानसभेत महायुतीला यश मिळाल्यानंतर सर्व आमदारांना मुंबईच्या ताज लँण्ड्स एंड हॉटेलमध्ये बोलावण्यात आलं आहे. यावेळी प्रताप सरनाईक यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. गेल्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी त्याग केला त्याची चांगली फळं आज बघायला



मिळत आहेत असं सूचक विधानही त्यांनी केलं. "गेल्या मंत्रीमंडळात मी त्याग केला होता, मला आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र यंदा ते आश्वासन पूर्ण होऊन मला चांगलं कॅबिनेट मंत्रीपद मिळेल अशी आशा आहे," असं प्रताप सरनाईकांनी म्हटलं आहे. तसंच मुख्यमंत्रीपद आम्हाला मिळावं असंही त्यांनी म्हटलं आहे. शेवटी वरिष्ठ जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असंही त्यांनी सांगितलं आहे. "ज्या ठाणेकर जनतेला मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेंना पाहायला आवडेल, त्यांना मलाही मंत्री म्हणून पाहायला आवडेल. गेल्यावेळी मला तसं आश्वासन दिलं होतं. पण काही गोष्टींमुळे ते पूर्ण झालं नाही. पण यावेळी पूर्ण होईल असा विश्वास आहे. १०० टक्के कॅबिनेट मंत्रीपद मिळेल याची मला खात्री आहे. पण त्यागातही चांगले दिवस येतात. गेल्या निवडणुकीत त्याग केला होता, आता करावा लागणार नाही अशी आशा आहे," असा विश्वास प्रताप सरनाईकांनी व्यक्त केला आहे.

# शहाड येथे टपाल टिकीटांचे प्रदर्शन



**कल्याण (गणेश बागडे)** : दिनांक २८ आणि २९ नोव्हेंबर या कालावधीत " सेंच्युरी रेयॉन क्लब" कल्याण मुरबाड रोड, शहाड (पूर्व) येथे प्रादेशिक स्तरावरील फिलाटेली (टपाल टिकीटांचे प्रदर्शन ""गेमपेक्स – २०२४" भरविण्यात आले आहे. स्टँपच्या माध्यमातून विश्वातील विविध विषयांचे ज्ञानवर्धन व्हावे व स्टँपचा छापील वारसा जतन करण्याची प्रेरणा विध्यार्थ्यांना व नागरिकांना मिळावी हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. विविध खेळ आणि त्या संबधीचे विविध स्टँप व इतर दुर्मिळ स्टँप हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण आहे. फिलाटेली म्हणजेच टपाल तिकिटे जमवण्याचा छंद. यालाच छंदाचा राजा असेही संबोधले जाते. गेमपेक्स या प्रदर्शनात ठाणे, नाशिक, रायगड या जिल्ह्यातील टपाल तिकिटांचे संकलक आपले टपाल तिकिटांचे मौल्यवान संकलन प्रदर्शित करणार आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्या नंतरच्या सर्व दुर्मिळ स्टँपचा अमूल्य ठेवा या निमिताने विध्यार्थी आणि नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहे. या प्रदर्शनाचा सर्व विध्यार्थी आणि नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रादेशिक टपाल तिकीट प्रदर्शनीचे आयोजक वरिष्ठ डाकघर अधीक्षक ठाणे, समीर महाजन यांनी केले आहे.

# आमदार विश्वनाथ भोईर यांचा विजयात आंबेडकरी जनतेचा मोलाचा वाटा - समाजसेवक अजय सावंत





**कल्याण (यश सावंत)** : कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघात सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचा इतिहास महायुती शिवसेनेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी रचला आहे. भोईर यांच्या या यशामागे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी इतर मित्र पक्ष यांचा सहभाग आहे. तर विश्वनाथ यांना सर्वच जाती धर्म समाजातील नगरिकांनी मतदान केले असून त्यांच्या विजयामध्ये आंबेडकरी जनतेचा मोलाचा वाटा असल्याची प्रतिक्रिया अजिंठा फाऊंडेशनचे संस्थापक तथा समाजसेवक अजय सावंत यांनी दिली आहे. विश्वनाथ भोईर यांच्या विजयानंतर सावंत यांनी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या असून यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

विश्वनाथ भोईर यांच्या विजयाचा आम्हाला सर्वांना आनंद आहे. त्यांचा विजय हा सर्वसामान्यांचा विजय आहे, सर्व कल्याणकर यांचा विजय आहे. कल्याणचा एक इतिहास होता की एकदा आमदार निवडून आले की पुन्हा निवडून येत नव्हते, भोईर यांनी तो इतिहास पुसून काढला आणि नवीन इतिहास घडवला आहे. कल्याण शहराची स्मार्ट सिटी शहर म्हणून नोंद झाली आहे. शहराला संपूर्ण स्मार्ट सिटी बनवण्यासाठी विश्वनाथ भोईर हे पुन्हा आमदार हवेच होते. त्यांच्या विकास कामांमुळे तसेच त्यांच्या राजकारणात ते सर्व धर्मीयांना सर्व जातींना एकत्र घेऊन चालतात. सर्वांच्या समस्या जाणून घेत, सर्वांना न्याय देतात न्यायाची बाजू घेतात आणि असा आमदार आपल्याला पुन्हा हवा अशी जनतेची भावना होती. त्यामुळेचे महायुतीचं सर्व घटक पक्षांच्या नेत्यांनी पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी त्यांना मदत केली.

कल्याण पश्चिम विधानसभा क्षेत्रात मोठ्या संख्येने आंबडेकरी जनता राहत असून ज्या आंबेडकरी जनतेने विश्वनाथ भोईर यांना मतदान केले ते पक्ष बघून नाही तर विश्वनाथ भोईर यांचं काम, सामान्यांपर्यंत न्यायाची भूमिका हे गुण तसेच कल्याण शहराचा विकास पाहून आंबेडकरी जनतेने त्यांना मदत केली. त्यांचा या सिंहाच्या वाट्याने विश्वनाथ भोईर विजयी झाले असून त्या सर्वांचे मी आभार मानतो.

# कल्याणमध्ये फुल मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद



**कल्याण (विवेक गुंजाळ)** - रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण तर्फे आयोजित केलेली भव्य मॅरेथॉन अतिशय उत्स्फूर्तपणे आज संपन्न झाली. भारतभरातून सर्व वयोगटातील मिळून सुमारे २ हजार धावपटू या मॅरेथॉन मधे सहभागी झाले होते. तसेच कल्याण जवळील एका मतिमंद विद्यालयातील विद्यार्थीपक्ष सहभागी झाले होते. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणतर्फे चालवल्या जाणाऱ्या रोटरी दिव्यांग सेंटरच्या मदतीसाठी व इतर समाजाभिमुख सेवा प्रकल्पांसाठी निधी उभारण्यासाठी कल्याणमध्ये या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी स्पोर्टस सर्कल-भंडारी चौक, गांधारी ब्रीज जवळ, नवीन रिंग रोड, कल्याण पश्चिम येथून या मॅरेथॉनचा प्रारंभ झाला. फुल मॅरेथॉन पहाटे ३ वाजता, हाफ मॅरेथॉन ५.३० वाजता, १० किमी ६ वाजता, ५ किमी ७.३० व ३ किमी ८ वाजता सुरू झाली. बोरगावकर ग्रुपचे अध्यक्ष संजय बोरगावकर व रोटरी ठाणे जिल्ह्याचे प्रांतपाल रो. दिनेश मेहता यांच्या हस्ते विजेत्यांना पारितषिके देण्यात आली. या संपूर्ण मॅरेथॉनमधे फार उत्साहवर्धक व जल्लोषाचे वातावरणात होते. तसेच धावायच्या मार्गावर जागोजागी पिण्याचे पाणी, एनर्जी बुस्टर्स यांची उत्तम सोय होती असे सहभागी धावपटूंनी सांगितले आणि आयोजकांचे आभार मानले. कल्याण डोंबिवली महानगर पालिका, महाराष्ट्र पोलीस, वहातूक नियंत्रण कक्ष यांचे या मॅरॅथॉन साठी विशेष सहाय्य मिळाले.

# समाजमाध्यमांत पुन्हा एकदा ठाकरे बंधूंच्या एकत्रिकरणाचे वारे..



**ठाणे (रोहित जैसवार)** : मनसे आणि ठाकरे गटाची विधानसभा निवडणूकीत वाताहात झाल्यानंतर आता राज आणि उद्धव या दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र यावेत यासाठी सजामाध्यमांवर चर्चा सुरू झाल्या आहेत. मनसे आणि ठाकरे गटाचे तळागाळातील काही कार्यकर्ते देखील याबाबत खासगी बोलत आहेत. 'एक रहेंगे, तो सेफ रहेंगे, 'ठाकरे ब्रँड टिकविण्यासाठी दोघांनीही एकत्र यायलाच हवे', 'दोन्ही बंधूंनी महाराष्ट्रासाठी एकत्र यावे', 'बाळासाहेबांच्या विचार असलेल्या दोन्ही पक्षांनी एकत्र यावे', अशा विविध प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहेत. परंतु वरिष्ठ पदाधिकारी यावर थेट भाष्य करणे टाळत आहेत. शिवसेनेतून राज ठाकरे बाहेर पडल्यानंतर त्यांनी स्वत:चा पक्ष स्थापन करत निवडणूका लढविल्या. यापूर्वीही दोन्ही ठाकरे बंधू एकत्र यावेत अशी भावना काही कार्यकर्ते आणि पदाधिकारी व्यक्त करत होते. मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी देखील दोन्ही बंधू एकत्र यावेत यासाठी पुढाकार घेतला होता. परंतु त्यावेळी दोन्ही बंधू एकत्र आले नव्हते. मुंबईत अनेक निवडणूकांमध्ये शिवसेना विरुद्ध मनसे असेच चित्र समोर आले होते. यंदाच्या लोकसभा निवडणूकीत मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. तर विधानसभा निवडणूकीत राज ठाकरे यांनी स्वबळावर माहिम सह ठाणे, वरळी, यासह महत्त्वाच्या काही जागांवर उमेदवार उभे केले होते. राज ठाकरे यांनी या उमेदवारांसाठी सभा देखील घेतल्या. परंतु राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यासह सर्वच उमेदवारांना निवडणूकीत पराभव पत्करावा लागला. मागील निवडणूकीत राजू पाटील हे कल्याण ग्रामीण मतदारसंघातून निवडून आले होते. त्यांचाही आताच्या विधानसभा निवडणूकीत शिंदे गटाचे पदाधिकारी राजेश मोरे यांनी पराभव केला. या निवडणूकीत मनसेला एकही जागा मिळालेली नाही. त्यामुळे हा पराभव मनसेच्या जिव्हारी लागला आहे. तर ठाकरे गटाचे अनेक दिग्गज नेते मुंबई, ठाणे आणि कोकणात पराभूत झाले आहेत. मनसे आणि ठाकरे गटाची झालेली वाताहत पाहून आता दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची चर्चा होऊ लागली आहे.

# मुरबाड विधानसभा मतदारसंघात आमदार किसन कथोरे विक्रमी मताने विजय! अखेर महायुतीने गुलाल उधळला!

## मुरबाड तालुक्यात भाजप कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण! अखेर अप्पाने दादांना हरवले!

**मुरबाड (आकाश कांबळे)** - मुरबाड मतदार संघात महायुतीचे उमेदवार किसन शंकर कथोरे तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष पवार या दोन्ही मातब्बर उमेदवार मध्ये जोरदार रस्सीखेच झाल्याचे चित्र दिसून आले होते.

मात्र शनिवारी झालेल्या मतमोजणी मध्ये आमदार किसन कथोरे यांनी २०१९ चा विक्रम मोडून यावेळी एक लाख ७५ हजार ५०९ मते घेऊन विक्रमी विजय संपादन केला आहे.मुरबाड विधानसभा मतदार संघात सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यापासून महायुतीचे उमेदवार किसन कथोरे व महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष पवार यांच्यातच स्पर्धा पहायला मिळाली. परंतु पहिल्या फेरीपासून कथोरे यांनी पकडलेली आघाडी शेवटच्या फेरीपर्यंत कायम



ठेवली. पहिल्या फेरीत कथोरे यांना ८५०२ तर सुभाष पवारांना ४५०४ मते होती. त्यामुळे पहिल्याच फेरीत ३७०० मतांची आघाडी घेतली होती. अखेरच्या फेरीपर्यंत कथोरे यांनी घेतलेली आघाडी रोखण्यात पवार यांना यश आले नाही. त्यामुळे अखेरच्या फेरीत ५२३९२ हजार मतांची आघाडी घेऊन किसन कथोरे विजयी झाले. तर महा विकास आघाडीचे उमेदवार सुभाष पवार यांना १ लाख २३ हजार११७ मते मिळाली असून त्यांना या मतदारसंघात पराभव पत्करावा लागला आहे. या मुरबाड मतदार संघात आमदार किसन कथोरे यांना ५२ हजार ३९२ मताची आघाडी मिळाली आहे.

आपल्या विजयाची मिरवणूक काढण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ आपल्याला पुष्पहार हार घालून वंदन करून विजयी सभा घेतली आहे या विजयसभेमध्ये विरोधकांना चारी मुंड्या चित करून विरोधकांना अखेर आपण पाणी पाजले असून यावेळी बोलताना सांगितले की हा विजयी इथल्या विकास कामाचा आहे त्यामुळे मी तुम्हाला पुन्हा एकदा शब्द देतो की माझ्या विरोधात ज्यांनी निवडणुकीत मुरबाड, बदलापूर, कल्याण येथील सर्व आजी- मजी उतरले होते तरी मी सर्वांना एकटा आजी पूर्ण उरलो आहे हा विजय इथल्या जमलेल्या जनसामान्यांचा व विकासाच्या कामामुळे झाल्याचे शुभ संकेत आमदार किसन कथोरे यांनी दिले आहे. त्यामुळे या तालुक्यात चौथ्यांदा विजय मिळवला आहे तर एकूण पाचव्यांदा विजय संपादन करून मला तुम्ही विधानसभेमध्ये पाठवला आहे. यावेळी व्यासपीठावर ठाणे ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकु, उत्तम विशे ,माजी नगराध्यक्ष किसन कथोरे, नगराध्यक्ष मुकेश विशे, माजी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाले, मोहन गडगे नितीन मोहपे, ,अनिल घरर, दीपक पवार, यांच्यासह बदलापूर कल्याण, मुरबाड शहर, ग्रामीण येथील हजार कार्यकर्ते या मिरवणुकी सामील झाले होते. तर मुरबाड मतदार संघात एकच चर्चा सुरू आप्पांने दादांना हरवले.

# ठरलं तर मग' फेम सायलीचं शिक्षण माहितीये का? मिळवलंय Gold Medal



**‘ठरलं तर मग’ मालिकेतल्या साध्या, सोज्वळ सायलीने गेल्या दोन वर्षांत प्रत्येकाचं मन जिंकून घेतलं आहे. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ही भूमिका अभिनेत्री जुई गडकरी साकारत आहे. सध्या ‘ठरलं तर मग’ मालिका टीआरपीच्या शर्यतीत सुद्धा अग्रस्थानी आहे त्यामुळे छोट्या पडद्यावरची लाडकी सून म्हणून तिला घराघरांत ओळखलं जातं. मालिकाविश्व गाजवणाऱ्या या गुणी अभिनेत्रीचं शिक्षण किती आहे हे तुम्हाला माहितीये का? नुकत्याच घेतलेल्या ‘आस्क मी सेशन’मध्ये अभिनेत्रीने याचा उलगडा केला आहे.**

जुई गडकरी सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या आयुष्यातील प्रत्येक अपडेट्स, शूटिंगच्या सेटवरची धमाल, ‘ठरलं तर मग’ मालिकेचे प्रोमो ती नेहमी शेअर करते. याशिवाय जुई अनेकदा इन्स्टाग्रामवर ‘आस्क मी सेशन’ घेऊन चाहत्यांशी जोडून राहण्याचा प्रयत्न करते. नुकत्याच घेतलेल्या सेशनमध्ये अभिनेत्रीला तिच्या एका चाहत्याने शैक्षणितक पार्श्वभूमीबद्दल प्रश्न विचारला. याला उत्तर देताना जुईने तिने कोणत्या विषयात पदवी संपादन केलीये याचा खुलासा केला आहे.

जुई गडकरीचं शिक्षण

जुई गडकरीने आपलं पदवीपर्यंतच शिक्षण BMM मध्ये पूर्ण केलं आहे. Advertising विषयात पदवी संपादन करत जुईने मुंबई विद्यापीठाचं सुवर्ण पदक मिळवलं आहे. यानंतर जुईने पदव्युत्तर पदवी Advertising And PR या विषयात संपादन केली आहे. याशिवाय अभिनेत्रीने तिचं MBA मार्केटिंगमध्ये पूर्ण केलंय. याला जोडून जुईने तिचा डिप्लोमा डिजिटल मार्केटिंग विषयात पूर्ण केला आहे. आता अनेकांना प्रश्न पडेल एवढी उच्चशिक्षित जुई अभिनयाकडे कशी वळली? याबद्दल जाणून घेऊयात...

शिक्षण पूर्ण करत असताना आपण भविष्यात अभिनय क्षेत्रात येऊ असा जुईने कधीच विचार केला नव्हता. मात्र, लहानपणापासूनच तिला गाण्याची आवड होती. जुईच्या एका मैत्रिणीला कर्जतच्या एनडी स्टुडिओमध्ये मालिकेच्या ऑडिशनसाठी जायचं होतं. यावेळी जुई तिच्याबरोबर केवळ स्टुडिओ पाहण्यासाठी गेली होती. तिच्या मैत्रिणीचं सिलेक्शन काही झालं नाही. पण, तिथल्या उपस्थित कर्मचाऱ्यांनी जुईला ऑडिशन देण्यासाठी भाग पाडलं अन् तिची ‘श्रीमंत पेशवा बाजीराव मस्तानी’ या मालिकेसाठी निवड झाली. यामध्ये जुईने ‘चंदा’ ही सहायक भूमिका साकारली होती आणि इथूनच तिच्या अभिनय क्षेत्रातील प्रवासाला सुरुवात झाली.

जुई गडकरीचं शिक्षण किती आहे ?

‘श्रीमंत पेशवा बाजीराव मस्तानी’नंतर काही मालिकांमध्ये जुईने सहाय्यक अभिनेत्री म्हणून काम केलं. मात्र, त्यानंतर २०११ मध्ये आलेली ‘पुढचं पाऊल’ मालिका जुईसाठी गेमचेंजर ठरली. यामध्ये तिने साकारलेल्या ‘कल्याणी’ या पात्राला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या मालिकेने जवळपास ७ ते ८ वर्ष छोट्या पडद्यावर अधिराज्य गाजवलं.

# ‘सूर्या’ संकटात असताना ‘शिवा’ मदतीला धावून येणार



‘लाखात एक आमचा दादा’ आणि ‘शिवा’ या दोन्ही प्रेक्षकांच्या लाडक्या मालिका आहेत. प्रेमळ स्वभावामुळे, साध्या राहणीमानामुळे व सर्वांच्या मदतीला धावून जाण्याच्या सवयीमुळे सूर्या दादा प्रेक्षकांना त्यांच्यातीलच एक वाटतो, तर कुटुंबासाठी काहीही करण्यास तयार असणारी, धाडसी शिवा प्रेक्षकांचे मन जिंकून घेते. आता शिवा व सूर्या दादा प्रेक्षकांना एकत्र भेटण्यासाठी येणार आहेत. याचा एक प्रोमो झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर शेअर केला आहे. झी मराठी वाहिनीने इन्स्टाग्रामवर एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, सूर्या रस्त्यावर गुंडांच्या मध्ये उभा आहे, तो त्यांच्याबरोबर मारामारी करत आहे. तुळजा त्याच्याकडे पळत येताना दिसते. तोपर्यंत एक गुंड तिला धरतो. तुळजा मोठ्याने सूर्या असे ओरडते. तो गुंड तिला ब्रीजवरून खाली फेकतो. सूर्या तिला वाचवण्यासाठी पळत जातो. तुळजाने कशालातरी पकडले असल्याने ती खाली नदीत पडली नाही. सूर्या तिला हात द्यायला जातो, मात्र गुंड त्याला मारण्यासाठी येतात. तितक्यात त्या गुंडांना कोणीतरी मारताना दिसते आणि सूर्याकडे मदतीचा हात पुढे केला जातो. तो शिवाचा हात असतो. शिवा सूर्याला वाचवते. सूर्या वरती येतो आणि दोघे मिळून गुंडांना मारतात. यावेळी त्यांच्या लहानपणी ते एकमेकांना हात देत असल्याचा सीन पाहायला मिळतो. हा व्हिडीओ सुरू असताना ऐकायला मिळते, “नजर त्याची पॉवरफुल, दुश्मनांची होते हवा गुल, आला कोणी आडवा तर हिशोब एकच, मरेपर्यंत तुडवा. पण, जेव्हा काळजावर होतो त्याच्या वार, नशिबासमोर होते हार; तेव्हा मदतीला येतो एकच हात आणि संकटावर तो करतो मात, धमाल मनोरंजनाचा आहे वादा, एकत्र भेटायला येताहेत शिवा-दादा” प्रोमोमध्ये दाखविल्याप्रमाणे शिवा आणि सूर्या लहानपणीचे मित्र आहेत, त्यामुळे आता शिवा आणि सूर्या दादा एकत्र दिसणार असल्याने कोणती गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे दिसत आहे. ‘लाखात एक आमचा दादा’ मालिकेत सध्या तेजूच्या लग्नाची तयारी सुरू आहे, तर ‘शिवा’ मालिकेत आशू आणि शिवामध्ये पुन्हा एकदा दुरावा आल्याचे पाहायला मिळत आहे, त्यामुळे मालिकेत पुढे काय होणार याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

## “महाराष्ट्र हरलास तू”, विधानसभेच्या निकालानंतर तेजस्विनी पंडितची पोस्ट



महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडलं. २८८ मतदारसंघांत झालेल्या मतदानानंतर आज २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं आहे. पण, राज ठाकरेंच्या मनसेला २०२४ च्या निवडणुकीत एकही खातं उघडता आलेलं नाही. या निकालावर आता राजकीय वर्तुळासह मनोरंजन विश्वातून देखील प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. अभिजीत केळकर, प्रसाद ओक, मेघा धाडे, सुशांत शेलार, परेश रावल यांसारखे अनेक कलाकार या विधानसभेच्या निकालांवर आपली मतं मांडत आहेत. अशातच अभिनेत्री तेजस्विनी पंडितने शेअर केलेली पोस्ट सर्वत्र चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर तेजस्विनी मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे व्हिडीओ व फोटो पोस्ट करत ती चाहत्यांना वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्याच्या अपडेट देत असते. अभिनयाबरोबरच तेजस्विनी आपल्या स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. अनेकदा सोशल मीडियाच्या माध्यमातून ती आपले मत परखडपणे मांडत असते. आता नुकत्याच शेअर केलेल्या एक्स पोस्टमुळे तेजस्विनी चर्चेत आली आहे. ही पोस्ट आहे राज ठाकरे आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांसंदर्भातली. अभिनेत्री नेमकं या पोस्टमध्ये काय म्हणालीये जाणून घेऊयात... “विजयी उमेदवारांचं अभिनंदन! कोण? कसं? आणि काहीजण का नाही हे अनुत्तरीत राहिल, त्यांच्या Micro Management ला १००/१००. पण तरीही... राजसाहेब ठाकरे #एकनिष्ठ #सदैवसोबत. आमचा राजा हरला नाही, महाराष्ट्र हरलास तू” अशी भावुक पोस्ट शेअर करत तेजस्विनीने पुढे हार्टब्रेक इमोजी दिला आहे.

# माझी तुझी रेशीमगाठ’ फेम अभिनेत्री झळकणार ‘लक्ष्मी निवास’ नव्या मालिकेत




‘झी मराठी’ वाहिनीवर लवकरच नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ‘लक्ष्मी निवास’ असं नव्या मालिकेचं नाव आहे. अभिनेते तुषार दळवी, हर्षदा खानविलकर, अक्षया देवधर, दिव्या पुगावकर असे तगडे कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत. आतापर्यंत या नव्या मालिकेचे दोन दमदार प्रोमो प्रदर्शित झाले आहेत. त्यामुळेच ‘लक्ष्मी निवास’ नव्या मालिकेची जोरदार चर्चा रंगली आहे. या नव्या मालिकेत ‘माझी तुझी रेशीमगाठ’मध्ये झळकलेली अभिनेत्री पाहायला मिळणार आहे.

अभिनेता श्रेयस तळपदे आणि अभिनेत्री प्रार्थना बेहेरे अभिनीत ‘झी मराठी’ वाहिनीवरील ‘माझी तुझी रेशीमगाठ’ ही मालिका चांगलीच गाजली. या मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांची मनं जिंकली होती. तसंच मालिकेतील प्रत्येक पात्र लोकप्रिय ठरलं. मग ते सकारात्मक पात्र असो किंवा नकारात्मक पात्र असो. प्रत्येक पात्राला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं होतं. असंच एक लोकप्रिय ठरलेलं पात्र म्हणजे मीनाक्षी वहिनी. अभिनेत्री स्वाती देवल हिनं हे पात्र उत्तमरित्या निभावलं होतं. आता हीच मीनाक्षी म्हणजेच स्वाती देवल पुन्हा एकदा नव्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. यासंदर्भात तिने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.

‘लक्ष्मी निवास’ मालिकेतील नव्या प्रोमोमध्ये स्वाती देवल झळकली आहे. हाच प्रोमो शेअर करत स्वातीने लिहिलं आहे, ‘माझी तुझी रेशीमगाठ’ या मालिकेमधल्या मीनाक्षीनंतर एक अतिशय भन्नाट अशी भूमिका घेऊन मी पुन्हा एकदा आपल्या सर्वांच्या लाडक्या ‘झी मराठी’वर ‘लक्ष्मी निवास’ या बहुचर्चित अशा मालिकेतून पुनरागमन करत आहे...आणि हो सगळयात महत्वाचं... मधे अनेक मालिका केल्या... ’कळत नकळत’ असो, ‘वादळवाट’ असो, ‘कुंकू’ असो, ‘एका पेक्षा एक’ असो, ‘उंच माझा झोका असो’ किंवा ‘फूबाईफू’ असो, ‘चला हवा येऊ द्या’चे काही भाग असो अशा अनेक काल्पनिक, नॉन फिक्शन मालिकांतून मी आजवर काम केलं, जे तुम्ही मायबाप प्रेक्षकांनी उचलून धरलं..आता तुम्ही माझ्या या ही भूमिकेला प्रेम द्याल अशी खात्री बाळगून लवकरच आमच्या मालिकेची तारीख घोषित करेन.”

“सर्वात अजून एक जुळून आलेली गोष्ट म्हणजे... २००७/२००८ साली ‘कळत नकळत’ या मालिकेतून माझी आणि हर्षदा ताईची सासू सुनेची जोडी भन्नाट गाजली... आता पुन्हा एकदा तब्बल १७ वर्षांनी थोडा नात्यात बदल करून ‘झी’शी नाळ जोडत तुम्हाला भेटेन...तुमचे असेच आशीर्वाद पाठीशी ठेवा... आणि हमखास प्रतिक्रिया द्या...तुम्हाला माहिती आहेच. मी माझ्या प्रत्येक प्रेक्षकांशी संवाद साधत असते... भेटूच तुमच्या प्रतिक्रिया मी नक्कीच इन्स्टाग्रामवर शेअर करेन. ‘लक्ष्मी निवास’ ही एक गाजलेली कन्नड मालिका आहे. ज्याचा हा रिमेक असला तरी पात्र आपल्या सर्वांच्या परिचयाची आहेत...भेटू प्रेक्षक हो...प्रचंड प्रेम... खूप खूप आभार,” असं स्वातीने लिहिलं आहे. दरम्यान, अलीकडेच स्वाती देवल ‘कलर्स मराठी’ वाहिनीवरील ‘सुख कळले’ मालिकेत पाहायला मिळाली होती. या मालिकेत स्वातीने

## अबीर गुलाल फेम अभिनेत्रीचे निरोपाचे पत्र

मुंबई- कलर्स मराठी वाहिनीवर गेले काही दिवस नव्या मालिकांचे प्रोमो बरेच व्हायरल होत आहे. यामध्ये मराठीतले अभिनय सम्राट अशोक सराफ यांची अशोक मामा ही मालिका आहे. तसेच मैत्रींच्या दुनियेत नेणारी पिंगा ग पोरी पिंगा ही एक मालिका आहे. या मालिकांच्या प्रोमोमुळे प्रेक्षकही फार उत्सुक असुन तशा कमेंट सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. मात्र नवीन मालिका येऊ घातल्या की त्याचा फटका काही जुन्या मालिकांनी पडतोय असेचा काहीसे झाले कलर्स मराठीवरील अबीर गुलाल या मालिकेच्या बाबतीत.

२७ मे ला सुरू झालेली मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात भरली. या मालिकेचे व्हिडिओ बरेचदा सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. बिग बॉस मराठी ४ चा विजेता अक्षय केळकर, तुला पाहते रे फेम गायत्री दातार महत्वाच्या भूमिकेत होते, यांच्यासोबतच अभिनेत्री पायल जाधव ही प्रमुख भूमिकेत होती. पायलची ही पहिलीच मालिका होती ज्यामध्ये तिने लीड भूमिका साकारलेली. पण तिला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळाले.



मालिका म्हटलं की त्याचे १५-१६ तास शूटिंग चालू असते. त्यामुळे कलाकार मंडळी आपला बहुतांश वेळ हा सेटवरच घालवतात. तिथे त्यांचा वेगळा असा एक घरोबा झालेला असतो. पण मालिका संपल्यावर ती धमाल मस्ती पुन्हा अनुभवता येणार नाही याची रुखरुख कलाकारांच्या मनात लागते. अबीर गुलाल मालिकेत पायलने श्री, गायत्रीने शुभ्रा तर अक्षयने अगस्त्य हे पात्र साकारलेली. श्री आणि अगस्त्य नवराबायको असतातच पण याहून अधिक ते एकमेकांचे चांगले मित्र असतात

# यश आणि श्वेताचा साखरपुडा थांबविण्यासाठी लीलाची अनोखी युक्ती



‘नवरी मिळे हिटलरला’ या मालिकेत सतत ट्विस्ट येत असतात. मालिकेचे कथानक आणि एजे व लीला ही पात्रे प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. आता या मालिकेत यश व श्वेताच्या लग्नाची तयारी सुरू असल्याचे दिसत आहे. हे लग्न स्वत: एजेने ठरवले आहे. मात्र, यशचे प्रेम लीलाची बहीण रेवतीवर असते. मात्र, दुर्गाच्या दबावामुळे यश आणि रेवती एजेला खरे सांगत नाहीत. आता मात्र मालिकेत ट्विस्ट येणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे.

लीला नेमकं काय करणार?

‘झी मराठी’ वाहिनीने सोशल मीडियावर नवरी मिळे हिटलरला या मालिकेचा प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोच्या सुरुवातीला रेवती दवाखान्यात असून एजे तिला भेटायला गेला आहे. रेवती रडत असून, “जे तू मला सांगितलं नाहीस, ते तुझ्या अश्रूंनी मला सांगितलं,” असे एजे तिला म्हणून तिचे अश्रू पुसतो. तो तिच्या डोक्यावर हात ठेवून म्हणतो, “तुझ्यापुढे माझा शब्द, माझं प्रॉमिस, सगळ्याची व्हॅल्यू झिरो आहे. दुसरीकडे यश आणि श्वेताचा साखरपुडा चालू असल्याचे दिसत आहे. गुरुजी सांगतात, “आता दोघांनी एकमेकांना अंगठ्या घाला.” तितक्यात वेश बदलून लीला येते आणि “थांबा”, असे म्हणते. कसला तरी धूर करते. थोड्या वेळाने सर्वांच्या लक्षात येते की, यश जागेवर नाही. लक्ष्मी दुर्गाला म्हणते, “वहिनी यश कुठेय?” त्यानंतर दुर्गा यशला हाक मारताना दिसत आहे.

मालिकेत दाखविल्याप्रमाणे, काही दिवसांपूर्वी एजेबरोबर ठरलेले लग्न मोडले, याचा त्रास होत असल्याचे सांगत श्वेता एजेसमोरच आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे एजेला तुरुंगातदेखील जावे लागते. एजे बाहेर आल्यानंतर श्वेता त्याची माफी मागते. एजे तिच्या लग्नाची जबाबदारी घेतो आणि तिचे लग्न यशबरोबर ठरवतो. मात्र, यशचे प्रेम लीलाची बहीण रेवतीवर असते. लीला रेवतीची समजूत काढते आणि तिचे प्रेम यशवर आहे, हे एजेला सांगण्यासाठी तयार करते. त्या एजेकडे जात असतात. त्याच वेळी लीला आणि रेवतीचा अपघात होतो. दोघींना दवाखान्यात दाखल केले जाते. एजे त्यांना भेटायला येतो. लीला त्याला म्हणते, हा अपघात कोणी केला आहे, ते मला माहीत आहे.

दरम्यान, आता मालिकेत पुढे काय होणार, सत्य समजल्यानंतर एजे आणि लीला एकत्र येणार का, की पुन्हा त्यांच्यात भांडण होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. श्वेताचे सत्य सगळ्यांसमोर कसे येणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे दिसत आहे.

**मेष** – आपल्या हातातील कामे वेळेवर पूर्ण होतील. चिकाटी सोडून चालणार नाही. कौटुंबिक खर्चाचा ताळमेळ जुळवावा लागेल.

**वृषभ** – गोड बोलून तुमची फसगत होऊ शकते. आपली वस्तू नीट सांभाळा. आरोग्यात काही प्रमाणात सुधारणा होऊ शकते.

**मिथुन** – नोकरीत आपला प्रभाव पडेल. धंद्यात फायदा होईल. वादविवादात सहभागी होऊ नका. दिवसभर कामात गुंतून राहाल.

**कर्क** – जोडीदारावर खर्च करावा लागेल. मतभिन्नता दर्शवून चालणार नाही. नवीन ओळख होईल. आपले आप्तेष्ट भेटतील.

**सिंह** – तुमच्या क्षेत्रात वर्चस्व वाढेल. सामाजिक गोष्टींची जाणीव जागृत ठेवा. निश्चयावर ठाम राहा. वैचारिक सैरभैरता टाळावी.

**कन्या** – गैरसमज वाढू देऊ नका. इतरांची तुमच्याकडून मदतीची अपेक्षा राहील. घरगुती वातावरण प्रसन्न ठेवावे. खरेदी कराल.




**तूळ** – व्यवसायात चांगला लाभ होईल. काही कठोर निर्णय घ्यावे लागू शकतात. महत्त्वाची वस्तू वेळच्या वेळी जागेवर ठेवा.

**वृश्चिक** – कुटुंबासाठी खर्च कराल. तुमचा अंदाज योग्य असेल. कोर्ट केसमध्ये योग्य सल्ला घ्या. मनाच्या चंचलतेवर मात करावी.

**धनु** – खंबीरपणाने महत्त्वाचा निर्णय घेऊ शकाल. प्रेमाला चालना मिळेल. भावंडांकडून त्रास संभवतो. प्रवासात काळजी घ्यावी.

**मकर** – अधिक कष्ट पडले तरी कामे पूर्ण होतील. मित्रांची मोलाची मदत मिळेल. विरोधकांचा विरोध मावळेल. मान-प्रतिष्ठा वाढेल.

**कुंभ** – भावना आणि व्यवहारात गुंता होऊ शकतो. आपल्या सरकारी कामाला चांगली गती येईल. कौटुंबिक खर्च वाढता राहील.

**मीन** – इतरांना मनापासून मदत कराल. नोकरीत काम वाढेल. काळाची पावले ओळखून वागा. जोडीदाराची मर्जी सांभाळावी लागेल.

# पुणे जिल्ह्याचे कारभारी अजित पवारच! प्रचाराची शैली बदलल्याने मतदारांची साथ



पुणे : राजकीय भवितव्य पणाला लागलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यात आठ जागा जिंकून आपणच जिल्ह्याचा कारभारी असल्याचे दाखवून दिले आहे. अनेकदा रागात बोलणारे, 'बघून घेतो' अशी जाहीरपणे दमबाजी करणारे, एखादा शब्द चुकीचा वापरून वादात सापडणारे अजित पवार यांनी भाजपच्या संगतीत आल्यानंतर यंदाच्या निवडणुकीत जिल्ह्यात प्रचार करताना प्रचारशैलीत कमालीचा बदल केला होता. कोणतेही वादग्रस्त विधान न करता आणि वैयक्तिक टीका-टिप्पणी टाळून 'विकास' या मुद्द्यावर केलेल्या प्रचारामुळे मतदारांनी त्यांना साथ दिल्याचे निकालावरून स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यात राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन पक्षांच्या वर्चस्वाचा प्रश्न होता. त्यात अजित पवार यांचे राजकीय भवितव्य या निवडणुकीच्या निकालानंतर ठरणार होते. त्यामुळे अजित पवार यांनी या वेळच्या निवडणुकीत नियोजनबद्ध प्रचार केल्याचे दिसून आले. विशेषत: बारामतीत प्रचार करताना त्यांनी विकासावरच भर दिला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविषयी ते आदराने बोलत राहिले. कुटुंबातील सदस्यांवरही शेलक्या शब्दांत नाराजी व्यक्त करत राहिले. त्यामुळे त्यांची रागीट ही प्रतिमा प्रचाराच्या काळात बाजूला पडली. शिवाय 'लाडकी बहीण योजने'च्या माध्यमातून त्यांना महिला मतदारांकडूनही प्रतिसाद मिळाला.

जिल्ह्यातील दहा मतदारसंघांपैकी मावळ आणि पुरंदरवगळता बारामती, इंदापूर, भोर, आंबेगाव, शिरूर आणि खेड-आळंदी या मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन 'राष्ट्रवादी'मध्ये थेट लढती होत्या. त्यामध्ये एकाही ठिकाणी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला यश मिळाले नाही. मावळमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने उमेदवार उभा न करता अपक्षाला पाठिंबा दिला होता. मात्र, त्या ठिकाणीही ते अपयशी ठरले. बारामतीतून अजित पवार, आंबेगावमधून दिलीप वळसे, इंदापूरमध्ये दत्ता भरणे, भोरमध्ये शंकर मांडेकर, शिरूरमध्ये माऊली कटके, मावळमधून सुनील शेळके असे सहा जण जिल्ह्यातून विजयी झाले, तर पुणे शहरात हडपसरमधून चेतन तुपे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी मतदारसंघातून अण्णा बनसोडे हे दोन्ही आमदार सलग दुसऱ्यांना निवडून आले.

अजित पवार यांनी पुरंदर मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय घेतला होता. त्या ठिकाणी शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांच्या विरोधात माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे यांना उमेदवारी दिली होती. मात्र, या ठिकाणी ते अपयशी ठरले. शिवतारे विजयी झाले, तर झेंडे तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला जिल्ह्यात दोन ठिकाणी पराभव पत्करावा लागला. खेड-आळंदीमध्ये दिलीप मोहिते पराभूत झाले. या ठिकाणी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे बाबाजी काळे हे विजयी झाले. जुन्नरमध्ये अतुल बेनके हे यशस्वी होऊ शकले नाहीत. या मतदारसंघात मनसेचे माजी आमदार शरद सोनवणे यांनी अपक्ष निवडणूक लढवून ते विजयी झाले.

## उत्तर महाराष्ट्र: तरीही ऐतिहासिक यश

**नाशिक (सचिन कदम)** - लाडक्या बहिणींचा प्रतिसाद, धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रभाव, शेतीमालाच्या हमीभावासह महागाईसारखा मुद्दा बेदखल, ओबीसी समाजाची एकजूट आणि कथित लक्ष्मी दर्शन याचा संगम उत्तर महाराष्ट्रात महायुतीच्या अभूतपूर्व विजयात झाला. विधानसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रातील ३५ पैकी महायुतीने ३३ जागांवर वर्चस्व मिळविले असून एकाच आघाडीला इतक्या मोठ्या प्रमाणात यश मिळण्याची ही येथील पहिलीच वेळ आहे. कोणतीही ठोस विकासकामे झालेली नसतानाही महायुतीला भरघोस यश लाभल्याने मतदारांनी टाकलेला विश्वास सिद्ध करण्याचे आव्हान महायुतीपुढे आहे.

लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीविरोधात उत्तर महाराष्ट्राने कौल दिला होता. तेव्हा सहापैकी केवळ दोन जागांवर महायुतीला यश मिळाले होते. या अपयशातून बोध घेत आखलेली व्यूहरचना महायुतीला विधानसभा निवडणुकीतील यशाकडे घेऊन गेली. नाशिक, जळगाव आणि धुळे वगळता उत्तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांशी संबंधित समस्याच अधिक आहेत. नाशिक जिल्ह्यातील कांदा आणि द्राक्ष उत्पादकांमध्ये निवडणुकीचे गणित बदलविण्याची ताकद असल्याचे लोकसभा निवडणुकीत दिसले होते. त्यामुळे निर्यात बंदी उठविण्यासह आवश्यक त्या उपाययोजना करून त्यांची नाराजी कमी करण्याचा प्रयत्न केंद्र आणि राज्य सरकारने केला. लोकसभेवेळी दोन ते अडीच हजार प्रतिक्विंटल असलेले कांद्याचे दर कमी होणार नाहीत, याची दक्षता सरकारने घेतली.

SPORT

# Shreyas Iyer Becomes Costliest Player In IPL Auction History, Sold To Punjab Kings For Rs..

**New Delhi -** Indian cricket team batter Shreyas Iyer became the costliest player in the history of the Indian Premier League (IPL) auction history. Shreyas, who was the Kolkata Knight Riders captain in IPL 2024, was bought for a mammoth sum of Rs 26.75 crore by Punjab Kings. Punjab Kings and Delhi Capitals were locked in a huge bidding war for the star batter but it was Punjab who finally emerged victorious. Previously, the biggest auction buy was Australia fast bowler Mitchell Starc who joined KKR for Rs 24.75 Crore.

Punjab Kings have bought India pacer Arshdeep Singh for Rs 18 crore after using their Right to Match (RTM) card in the IPL 2024 Auction here at the Abadi Al Johar Arena in Jeddah on Sunday.

Arshdeep, with a base price of Rs 2 crore, was the first pick of the auction in the first set of marquee players.



Chennai Super Kings were the first to raise their paddle followed by Delhi Capitals, Gujarat Titans, Rajasthan Royals and Sunrisers Hyderabad.

Sunrisers Hyderabad won the final bid for Arshdeep at Rs 15.75 crore before Punjab used their RTM card for their player. SRH raised the price to Rs 18 cr which Punjab agreed to spare to acquire the services of the pacer.

The two-day bidding action began after the opening speech from the IPL Chairman Arun Dhumal.

Punjab Kings have the highest purse of Rs 110.5 crore for the two-day gala event after retaining just two players - Shashank Singh, and Prabhsimran Singh - before the auction.

Kagiso Rabada was the next player on the list and was bagged by Gujarat Titans for Rs 10.75 crore. GT headed to the auction with a purse of Rs 69 crore after retaining Rashid Khan, Shubman Gill, Sai Sudharsan, Rahul Tewatia and Shahrukh Khan.

# IPL CSK Team 2025 Players List: Chennai Super Kings complete players list, squad

**New Delhi -** Chennai Super Kings will embrace the fresh IPL cycle with one eye on their transition after MS Dhoni stepped down from captaincy last season. In a new cycle under Ruturaj Gaikwad, CSK will inevitably look at revamping their squad without entirely giving up on their legacy.

With the 43-year-old Dhoni staying put for another season, CSK managed to retain their talisman without having to splurge a fortune. The new IPL rule allowing Indian internationals to bracketed in the uncapped category if they have gone five years without a BCCI contract or national team appearance helped CSK to secure Dhoni for as low as Rs 4 crore. CSK also retained all-rounder Ravindra Jadeja for as high as 18 crore, alongside skipper Ruturaj, despite the 35-year-old recently retiring from T20Is. Shivam Dube and Matheesha Pathirana firmed up other retentions, leaving the side with one RTM card for the IPL Mega Auction.




### Chennai Super Kings Full IPL 2025 squad :

| Player | Role | Price |
|---|---|---|
| Ruturaj Gaikwad | Batter | Rs 18 crore |
| Ravindra Jadeja | All-Rounder | Rs 18 crore |
| Matheesha Pathirana | Bowler | Rs 13 crore |
| Shivam Dube | All-Rounder | Rs 12 crore |
| MS Dhoni | Wicketkeeper/Batter | Rs 4 crore |

# Sunil Gavaskar slams Bharat Army for disrespecting Indian Tricolor

**New Delhi -** Sunil Gavaskar has taken aim at India's most popular supporter group "Bharat Army" for showing disrespect to the Indian flag in the first Test match against Australia at Perth's Optus Stadium. Sunil Gavaskar has urged Bharat Army to change their flags, which has "Bharat" and "Army" written over them.



"I know that in India it's not accepted," Gavaskar said while doing commentary on ABC Sport during day two of the first Test against Australia.

"I don't think these [fans] are really Indians. I'm not too sure how many of them have Indian passports, so they probably don't understand the value, the relevance, the importance of the Indian flag.

"All Indians, including me, are very grateful for the support that they bring to the Indian cricket team wherever the Indian cricket team is playing. We are really, really thankful and grateful for that, but I would request them not to have their group's name on the India flag.

"Design a new flag of your own. If you design a new flag of your own, I will myself wear it with great pleasure."

According to section two of the Prevention of Insults to National Honour Act, 1971, "there shall be no lettering upon the national flag" of India.

It states: "The national flag shall not be used as a portion of costume or uniform or accessory of any description which is worn below the waist of any person nor shall it be embroidered or printed on cushions, handkerchiefs, napkins, undergarments or any dress material."

The Bharat Army was formed in 1999, and has close ties with the Indian cricket team and has more than 160,000 members globally.

# Lakshya Sen needs to know his defense isn't just dazzling, but dependable too

**New Delhi -** Lakshya Sen's sensational defense can drop jaws and create crowd highlight packages, a little like Rishabh Pant's one-handed sixes. But at the China Masters this week, Anders Antonsen slapped a 21-18, 21-15 victory onto Sen in quarters – though early in the match, Sen pulled off his behind-the-back dazzling defense for a winner. But it was yet another example of the Indian, giving up when things got tough. Sen is gutsy, but not gritty enough. He can dazzle with his unique talent – his many eye-popping shots, the quick reactions, the slowly-developing kill smash, but he's not determined enough to fight the boring attritional battles.




Antonsen looks constantly restless to the casual watcher, but his resilient game is reliable. But what brought Sen down were old refrains. Almost broken record reels. A 5-point lapse of concentration, taking the foot off the pedal from 13-11 to 13-16, which remains a mystery in his game. The grief-giving sort of mystery, not an enchanting one. 11-8 up, Sen was comfortably catching the Dane on his far forehand with neatly effective down-the-line smashes. But all it took for Antonsen to turn the tables was drawing Sen into longer rallies, which frustrated the Indian no end. It's a curious case because Sen is not low on endurance. He posts some of the best numbers in all metrics that combine towards stamina, so he's not low on fuel. He has the defensive mettle to last those rallies, he can run, he can anticipate, the slow courts actually help not put too much pressure on his defense and he is a tremendously intelligent shuttler, one of the world's smartest in reading his opponents. At times you wonder, in fact, if he enjoys defensively dazzling spells too much and unnecessarily prolongs rallies, just because he can.

# "Always Stable, Always Solid": DY Chandrachud Praises This Retired Cricketer



**New Delhi :** Former Chief Justice of India DY Chandrachud, speaking at NDTV's Samvidhan @ 75 event, revealed his enduring love for cricket. Mr Chandrachud, who retired recently as the 50th Chief Justice of India, said that even though his schedule does not allow him, he tries his best to follow Indian cricket as much as he can.

"My favorite game is, of course, cricket," Mr Chandrachud said. "But I do not get the time to play. Also, I have become a bit old to play cricket these days."

Mr Chandrachud confessed to following the ongoing Border-Gavaskar Trophy Test series between India and Australia closely, albeit in bite-sized formats.

"I don't get to see the live broadcast, but I watch the 5-7 minute highlights every night to see how Virat Kohli has played, how Ravichandran Ashwin has bowled, or if Jasprit Bumrah has bowled well or not. Bumrah had bowled really well at Perth," he noted, reminiscing about Bumrah's match-winning five-wicket haul that skittled Australia for 104 in the first Test at Perth.

When pressed about his favourite cricketers, Mr Chandrachud named Jasprit Bumrah and Virat Kohli among the current players. "Among previous cricketers, I am a fan of Rahul Dravid - always stable, always solid," he said.

# सातारा जिल्ह्यात महायुतीचे निवडून आले आठ, बाकी सर्व झाले सपाट..

● सातारा, दिगंबर जाधव:

छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदार संघाच्या निकाल स्पष्ट झाला . यामध्ये महायुतीचे सर्व उमेदवार निवडून आलेआहेत . बाकी महाविकास आघाडी व अपक्ष असे सर्व उमेदवार सपाट झालेले आहेत. हा निकाल धक्कादायक असून अनेकांनी याबाबत नवल व्यक्त केले आहे.

सातारा जिल्ह्यातील सातारा जावळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना १ लाख ७६ हजार ८४७ व अमित कदम यांना ३४ हजार ७२५ मते मिळाली. यामध्ये १ लाख ४२हजार १२४ मताची आघाडी त्यांनी घेतली .कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे मनोज घोरपडे यांना १लाख ३४ हजार६२६ व त्यांचे प्रतिस्पर्धी माजी मंत्री



बाळासाहेब पाटील यांना ९० हजार ९३५मते मिळाली. यामध्ये ४३ हजार ६९१मताधिक्य मिळाले आहे. कराड दक्षिण मतदार संघातून डॉ. अतुल बाबा भोसले यांना एक१ लाख ३८ हजार २५४ व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना ९९ हजार ७५ मते मिळाली. या ठिकाणी ३९ हजार १७९ मताधिक्य मिळाले. माण खटाव मतदार संघात आ जयकुमार गोरे यांना १ लाख ५० हजार २१ मते मिळाली .त्यांचे प्रतिस्पर्धी प्रभाकर घार्गे यांना १ लाख ३४३ मतं मिळाली. त्या ठिकाणी ४९ हजार ६७५ मताधिक्य मिळाले. कोरेगाव मतदार संघात आ महेश शिंदे यांना १ लाख ३३ हजार९१४ व माजी मंत्री शशिकांत शिंदे यांना ९४ हजार ९७९मते पडली. या ठिकाणी ३८हजार ९३५ मताधिक्य मिळाले आहे. पाटण मतदारसंघात मंत्री शंभूराज देसाई यांना १ लाख २५ हजार ७५९ व त्यांचे प्रतिस्पर्धी अपक्ष सत्यजित पाटणकर यांना ९० हजार ९३५ व शिवसेना उबाठा गटाचे हर्षल कदम यांना ९६२६ मते मिळाली. या ठिकाणी ३४ हजार ८२६ मताधिक्य मिळाले. वाई खंडाळा महाबळेश्वर मतदारसंघात आ. मकरंद पाटील यांना १ लाख ४० हजार २७१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी सौ अरुणादेवी पिसाळ यांना ७९ हजार ५३९ मते पडली. या ठिकाणी ६१ हजार ३९२ मताधिक्य मिळाले . सातारा जिल्ह्यातील राखीव फलटण मतदारसंघात सचिन पाटील यांना १ लाख १९ हजार २८७ तर आमदार दीपक चव्हाण यांना १ लाख २हजार २४१ मते पडली. या ठिकाणी १७हजार ४६मताचे मताधिक्य मिळाले. अजित दादा पवार गटान यापूर्वी आमदार दिपक चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु रामराजे नाईक निंबाळकर यांनी अजितदादा गड सोडून पुन्हा एकदा राष्ट्रवादीकडे जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यासोबतच आमदार दीपक चव्हाण यांनीही राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे जाऊन उमेदवारी मिळवली होती. त्याचा त्यांना चांगला तोटा झालेला आहे. राजकारणामध्ये काही निर्णय हे धाडसाने घ्यावे लागतात. हे धाडस करण्यास आमदार चव्हाण यांना अपयश आल्यामुळे त्यांचा पराभव झाल्याचे विश्लेषण होत आहे. सातारा जावळी मतदारसंघातील आमदार श्री राजीव भोसले यांना महाराष्ट्रात सर्वाधिक मते मिळाल्यामुळे त्यांना मुख्यमंत्री करावे अशी मागणी आता काही मतदारांनी केलेली आहे हे वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.



# छत्तीसगडमध्ये १० नक्षलवादी ठार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दहा नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी सुरक्षा दलांच्या कामगिरीचे कौतुक केले असून, बस्तर भागात शांतता आणि प्रगतीचा काळ पुन्हा आल्याची प्रतिक्रिया दिली आहे. या भागात सुकमा जिल्ह्याचाही समावेश आहे. भेज्जी पोलीस स्थानकाच्या हद्दीत शुक्रवारी सकाळी चकमकीला सुरुवात झाली. सुरक्षा दलाचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेत सहभागी झाले. पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी ही माहिती दिली. माओवाद्यांच्या कोंता आणि किस्ताराम क्षेत्र समितीचे सदस्य जंगलात असल्याची माहिती मिळाल्यानंतर मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

# उत्तर मुंबईत भाजपचेच वर्चस्व; सहापैकी पाच मतदारसंघ युतीकडे

● मुंबई, विशाल कारंडे :

भाजपचा बालेकिल्ला असलेला उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीतही भाजपने आपले वर्चस्व राखले. दहिसर, बोरिवली, मागाठाणे, कांदिवली, चारकोप आणि मालाड या सहापैकी पाच मतदारसंघांत शिवसेना – भाजप महायुतीने विजय मिळविला. केवळ मालाड पश्चिम या मतदारसंघातून कॉंग्रेसचे अस्लम शेख चौथ्यांदा विजयी झाले असून भाजपचे उमेदवार विनोद शेलार यांना पराभव पत्करावा लागला.

दहिसर मतदारसंघात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार विनोद घोसाळकर यांनी विद्यमान आमदार मनिषा चौधरी यांना प्रचारात कडवी झुंज दिली होती.



मात्र त्यांना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच मनिषा चौधरी मतमोजणीत आघाडीवर होत्या. या मतदारसंघोत एकूण एक लाख ६० हजार मतदारांनी मतदान केले. त्यापैकी ९८ हजार ५८७ मते मनिषा चौधरी यांना, तर ५४ हजार २५८ मते घोसाळकर यांना मिळाली. घोसाळकर यांच्या मुलाच्या हत्येमुळे त्यांनी सहानुभूती मिळेल अशी चर्चा होती. मात्र त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

मराठी बहुल अशा मागाठाणे मतदारसंघात यावेळी शिवसेनेच्या दोन गटात लढत होती. शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) प्रकाश सुर्वे आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) उदेश पाटेकर यांच्यात लढत झाली. त्यात सुर्वे यांनी मोठा विजय मिळवला. सुर्वे यांना तब्बल एक लाखाहून अधिक मते मिळाली. सुर्वे पहिल्या फेरीपासूनच आघाडीवर होते. उदेश पाटेकर यांना ४७ हजार मते मिळाली. सुर्वे यांच्या विजयामुळे शिवसेनेला (एकनाथ शिंदे) ताकद मिळाली आहे.

बोरिवलीकरांनी परंपरेप्रमाणे भाजपला मोठे मताधिक्य दिले. भाजपचे नवखे उमेदवार संजय उपाध्याय यांना एक लाख ३९ हजाराहून अधिक मते मिळाली. तर शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) संजय भोसले यांचा तब्बल एक लाख २५७ मतांनी पराभव झाला आहे. भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांना उमेदवारी नाकारल्यानंतर झालेल्या नाराजी नाट्यानंतरही या मतदारसंघात भाजपने आपले मताधिक्य राखले आहे.

कांदिवली पूर्व मतदारसंघात भाजपचे उमेदवार अतुल भातखळकर यांनी तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. त्यांना तब्बल सव्वा लाख मते मिळाली आहेत. ८३ हजाराच्या मोठ्या मताधिक्याने त्यांचा विजय झाला. त्यांनी कॉंग्रेसच्या कालू बुधेलिया यांना पराजित केले.

चारकोप विधानसभा मतदारसंघात भाजपचे योगेश सागर यांनाही १ लाख २७ हजाराहून अधिक मते मिळाली. त्यांनी कॉंग्रेसच्या यशवंत सिंह यांचा तब्बल ९१ हजार मतांनी पराभव केला.

मालाडमध्ये कॉंग्रेसच मालाड पश्चिम विधानसभा मतदारसंघावर मात्र भाजपला विजय मिळवता आला नाही. कॉंग्रेसचे उमेदवार अस्लम शेख यांनी भाजपचे उमेदवार विनोद शेलार यांचा पराभव केला.

# शीव कोळीवाड्यातील सिंधी निर्वासितांच्या इमारतींचा पुनर्विकास : लवकरच म्हाडाच्या मुंबई मंडळ राबविणार निविदा प्रक्रिया

● मुंबई, यश सावंत :

जीटीबी नगरमधील शीव कोळीवाडा येथील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींच्या पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने मार्चमध्ये निविदा प्रक्रिया सुरु केली होती. मात्र या इमारतींचा पुनर्विकास, मुंबई मंडळाच्या निविदेवर आक्षेप घेत एका खासगी विकासाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या विकासकाच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान पुढील निर्णयापर्यंत या पुनर्विकासासंबंधी कोणतीही कार्यावाही न करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आणि या पुनर्विकासाला खीळ बसली होती. पण आता मात्र न्यायालयाने विकासकाची याचिका फेटाळून लावल्याने पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आता लवकरात लवकर पुढील कार्यवाही सुरू करून निविदा प्रक्रियेला पुन्हा सुरुवात करण्याचा निर्णय मुंबई मंडळाने घेतला आहे. त्यानुसार आता निविदेला मुदतवाढ देऊन त्यासंबंधीची प्रक्रिया पूर्ण करून कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलमेंट एजन्सीची अर्थात खासगी विकासकाची नियुक्ती करून पुनर्विकासाला प्रत्यक्ष सुरुवात करण्याचे मंडळाचे नियोजन आहे.

जीटीबी नगर येथील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींची दूरवस्था झाल्याने, इमारती दुरुस्तीच्या पलिकडे गेल्याने या इमारतींना मुंबई महानगरपालिकेने अतिधोकादायक घोषित केले.

त्यानंतर या इमारती मोकळ्या करून घेतल्या. पण या इमारतींचा पुनर्विकास कोण करणार असा प्रश्न होता. यासाठी रहिवाशांनी राज्य सरकारला साकडे घातले होते. त्यानुसार सरकारने म्हाडाच्या माध्यमातून या इमारतींचा पुनर्विकास मार्गी लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मुंबई मंडळाने सल्लागाराच्या माध्यमातून यासंबंधीचा अभ्यास केला.

# अदानी लाचखोरीप्रकरणी राज्यांनी आरोप फेटाळले



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

सौरऊर्जा प्रकल्पातील महागडे वीज खरेदी करण्यासाठी काही राज्यांतील सरकारी अधिकाऱ्यांना उद्योजक गौतम अदानी यांनी लाच दिल्याचा आरोप झाल्यानंतर या राज्यांनी हे आरोप फेटाळले. याप्रकरणी करण्यात आलेले आरोप असत्य आणि तथ्यहीन असल्याचे या राज्यात तत्कालीन सत्तेवर असलेल्या पक्षांच्या नेत्यांनी सांगितले. ओडिशामध्ये २००० ते जून २०२४ मध्ये सत्तेवर असलेल्या बिजू जनता दलानेही (बीजेडी) हे आरोप फेटाळून लावले. बीजेडी सत्तेवर असताना ओडिशामधील सरकारी अधिकाऱ्यांनी अदानी उद्योग समूहाकडून लाच घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र ओडिशातील अधिकाऱ्यांवर झालेले आरोप खोटे असून वस्तुस्थितीवर आधारित नाहीत, असे ओडिशाचे माजी ऊर्जामंत्री आणि बीजेडीचे आमदार पी. के. देब यांनी सांगितले. उद्योजक गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेने लाचखोरीचा आरोप केल्याने त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली. संसदेच्या आगामी अधिवेशनात कॉंग्रेस हा मुद्दा उपस्थित करेल आणि आरोपांची चौकशी करण्याची मागणी करेल सरकारला सर्व काही माहीत आहे.

# वर्धा जिल्ह्यातून कॉंग्रेसची घराणेशाही हद्दपार

● वर्धा, नितीन देवळेकर :

जिल्ह्यातील चारही मतदारसंघात कॉंग्रेस पराभूत झाली आहे. मयुरा अमर काळे, शेखर शेंडे, रणजित कांबळे हे वारसदार तर वारसा नसलेले युवा उमेदवार अतुल वांदिले असे चौघेही घरी बसले आहे. मयुरा अमर काळे यांचा पराभव तर घराणेशाहीचे उबग आणणारे उदाहरण ठरले होते. त्याचे बेधडक समर्थन करणारे खासदार अमर काळे हे दिवं. माजी मंत्री शरद काळे यांचे चिरंजीव. सुप्रिया सुळे सांगून गेल्या की मयुरा माझ्या नात्यात तर राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांचे अमर काळे यांचे मामा. त्याच नात्याचा दबाव आणत तिकीट आणायची व मतदारांना भावनिक साद घालायची, असे राजकारण आर्वीतून मतदारांनी नापसंद केले आहे.



देवळीत माजी मंत्री दिवं. प्रभा राव यांचे भाचे असलेले रणजित कांबळे हे दरवेळी निवडून येतातच कसे, असा राजकीय वर्तुळस नेहमी पडणारा प्रश्न. अरेरावी व उद्दामपणा याचे प्रतीक म्हणून कांबळे यांच्यावर टीका व्हायची. ती खरी असल्याचे मतदार सांगते झाले आहे. वर्ध्यात शेखर शेंडे हे माजी मंत्री दिवं. विधानसभा उपाध्यक्ष प्रमोदबाबू शेंडे यांचे सुपुत्र. राजकीय वारसा त्यांनी मिळविला. पण चौथ्यांदा यशाने पाठ फिरविली. त्यांचे आजोबा भाऊसाहेब शेंडे हे पण आमदार राहून चुकले. परिघातील तेली समाजाचं नेतृत्व त्यांच्याकडे. मात्र अधिकचे सर्व सामाजिक संबंध पण त्यांनी जुळविले. पण हे नकोच, असा निरोप मतदारांनी त्यांना दिला आहे. लोकसभा निवडणुकीत अमर काळे यांना आघाडीने उमेदवार म्हणून पसंती दिली. लाटेत ते निवडून आलेही. पण पुढील काळात व आता निवडणुकीत त्यांना पत्नीसाठीच राजकीय धावाधाव करावी लागल्याने आघाडीच्या एकाही उमेदवारासाठी ते प्रचार करू शकले नाही. आता मतदारांनी त्यांना पुढे कुटुंबासाठीच वेळ देण्याचा सल्ला मतदानतून देऊन टाकला. तीन राजकीय घराण्यापुढे आता पुढे काय, हा प्रश्न मतदारांनी निर्माण करून ठेवला आहे. भाजपचे चारही विजयी उमेदवार हे राजकीय वारसा शून्य असलेले तर कॉंग्रेसचे तीन दमदार राजकीय वारसा सांगणारे. जिल्ह्याच्या पुढील राजकारणात कॉंग्रेसला सूचक संदेश देणारे हे मतदान ठरले असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# माथेरान मध्ये गटारावरील अतिक्रमणामुळे कचरा उचलण्यासाठी अडचणी

● माथेरान, भावना जैन :



माथेरानच्या मुख्य बाजारपेठेत रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गटारांच्या बाजूला केलेल्या अतिक्रमणांमुळे सफाई कामगारांना कचरा उचलण्यात अडचणी निर्माण होत असल्याने कचरा तसाच पडून आहे.त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागोजागी अतिक्रमणाने व्यापलेल्या माथेरानमध्ये आता मुख्य बाजारपेठेत सुद्धा रस्त्याच्या कडेला गटाराच्या बाजूला नगरपालिकेच्या जागेत पत्र्याचे कंपाउंड टाकून जागा बळकावण्याचा केविलवाना प्रयत्न केला जात आहे. या अतिक्रमणामुळे माथेरानच्या बाजारपेठेच्या सौंदर्याला बकालपणा आलेला असून पर्यटन नगरीत असे विद्रूपीकरण पर्यटकांच्या दृष्टीने अडचण निर्माण करणारे ठरत आहे.

याबाबत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना नागरिकांनी वेळोवेळी सूचना करून त्याचप्रमाणे याबाबत प्रसारमाध्यमांवर सुद्धा बातम्या प्रसिद्ध झालेल्या असताना देखील नगरपरिषद प्रशासन डोळेझाक करताना दिसत आहेत. प्रशासकीय राजवटीत मुख्याधिकाऱ्यांना सर्वाधिकार असताना त्यांनी आपल्या अधिकाराची अंमलबजावणी करणे गरजेचे असताना काही राजकीय मंडळींच्या आदेशाचे पालन करून अशा अतिक्रमणांवर दुर्लक्ष करीत आहेत की काय असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या पत्र्याच्या कंपाउंड मागील गटारात ओला आणि सुका कचरा काही व्यापारी वर्ग टाकत असल्याचे बोलले जात आहे . त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या तसेच पर्यटकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कमी बससंख्येमुळे पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांचा खोळंबा

● नाशिक, सचिन कदम :

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाशांच्या सेवेसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असताना काही ठिकाणी मात्र बससेवा विस्कळीत होत आहे. नाशिक-पुणे बससेवा यापैकी एक. रविवारी सायंकाळी एक तासापेक्षा अधिक वेळ थांबूनही पुण्याला जाण्यासाठी प्रवाशांचा खोळंबा कायम होता.

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने नाशिक-धुळे, नाशिक-बोरिवली, नाशिक-पुणे या मार्गांवर बसच्या फेऱ्या अधिक राहतात. विशेषत: नाशिक-पुणे ही बससेवा सातत्याने सुरू राहते. शनिवार-रविवार या आठवड्याच्या शेवटच्या दोन दिवसांमुळे, मतदान तसेच अन्य काही कारणांमुळे रविवारी मेळा बस स्थानकात पुण्याला



जाण्यासाठी प्रवाशांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. परंतु, प्रवाशांच्या तुलनेत बसची संख्या तसेच फेऱ्या कमी होत्या. स्थानकात काही बस उपलब्ध असताही त्या फेरीसाठी सोडल्या जात नव्हत्या.

खोळंबा झाल्याने किरण जाधव या प्रवाशाने भूमिका मांडली. जाधव हे पत्नीसह पुण्याला जाण्यासाठी रविवारी दुपारी चारनंतर स्थानकात आले. एक तासापेक्षा अधिक वेळ थांबूनही त्यांना शिवशाही, शिवनेरी, शिवाई यापैकी एकही मिळू शकली नाही. नोंदणी दालनाजवळ प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. फलाटावर उभ्या असलेल्या गाड्या आरक्षित असल्याचे सांगण्यात आले. अखेर सहा वाजेला त्यांना बस मिळाली. पुणे येथे नोकरी करणारे शनिवार आणि रविवारच्या सुटीनिमित्त नाशिकला आल्यावर पुन्हा रविवारी दुपारुन पुण्याकडे रवाना होतात. त्यामुळे इतर दिवसांच्या तुलनेत रविवारी पुण्याला जाणाऱ्यांची संख्या अधिक असते. अशी परिस्थिती असताना रविवारीच बससेवेला अधिक खोळंबा झाला. प्रवाशांवर तासनतास बसची प्रतिक्षा करण्याची वेळ आली. याविषयी विभाग नियंत्रक अरूण सिया यांनी माहिती दिली. बससेवेला खोळंबा झालेला नाही. जनशिवनेरी, शिवाई यांच्या फेऱ्या निश्चित आहेत. त्यासाठी आधीच नोंदणी केली जाते. अशा स्थितीत प्रवाशांची संख्या वाढल्यास जादा बस कुठून आणणार, असा प्रश्न त्यांनी केला.

# घरांच्या किमती कोट्याधीश!

● पुणे, अभिजित येरल्लू :



करोना संकटानंतर आलिशान घरांच्या मागणीत वाढ सुरू झाली. ही मागणी अद्यापही कमी झालेली नाही. यामुळे आलिशान घरांचा पुरवठा आणि विक्री यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत देशातील महानगरांमध्ये घरांची सरासरी किंमत १ कोटी २३ लाख रुपयांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात २३ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

अनारॉक ग्रुपने देशातील महानगरांमधील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल जाहीर केला आहे. या अहवालानुसार, यंदा एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहीत देशभरात २ लाख २७ हजार ४०० घरांची विक्री झाली. या व्यवहारांचे एकूण मूल्य २ कोटी ७९ लाख ३०९ रुपये आहे. गेल्या वर्षी याच सहामाहीत २ लाख ३५ हजार २०० घरांची विक्री झाली होती आणि त्यांचे एकूण मूल्य २ कोटी ३५ लाख ८०० रुपये होते. यंदा सहामाहीत घरांच्या विक्रीत ३ टक्के घट झाली असली तरी एकूण घरांचे विक्री मूल्य १८ टक्क्यांनी वाढले आहे. चालू आर्थिक वर्षात पहिल्या सहामाहीत विक्री झालेल्या घरांची सरासरी किंमत १ कोटी २३ लाख रुपये आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत घरांची सरासरी किंमत १ कोटी रुपये होती. दिल्लीत घरांच्या सरासरी किमतीत सर्वाधिक ५५ टक्के वाढ झाली आहे. मुंबईत मात्र घरांच्या सरासरी किमतीत कोणतीही वाढ नोंदविण्यात आलेली नाही. यंदा पहिल्या सहामाहीत मुंबईत ७७ हजार ३३५ घरांची विक्री झाली असून, त्याखालोखाल पुण्यात ४० हजार १९०, दिल्ली ३२ हजार १२०, बंगळुरू ३१ हजार ३८०, हैदराबाद २७ हजार ८२०, चेन्नई ९ हजार ५३० आणि कोलकत्यात ५ हजार २६५ घरांची विक्री झाली.